# पोलीस अधीक्षक श्री अनंत रोकडे यांचेकडुन पोलीस मित्रांचा सत्कार

पो.स्टे. पारशिवनी अंतर्गत दिनांक १६/०४/२०१६ रोजी रात्री २२.०० वा. दरम्यान परसोडी फाटा येथे टिप्पर व मोटारसायकलचा अपघात होवून मोटार सायकल वरील दोन तरुण मृतक नामे - क्र. १) मंगेश रामदास सुरपाते, वय २० वर्ष, रा. पारशिवनी २) शिशुपाल रामस्वरुप सरेआम, वय १८ वर्ष, रा. बादलापार जि. शिवनी म.प्र.हे जागीच मरण पावले. त्यावेळी मृतकाचे नातेवाईकांनी वर नमुद घटनास्थळावर गैरकायद्याची मंडळी जमवून वाहतुक अडवून घटनास्थळावरुन प्रेत हलविण्यास विरोध केला. आणि शासकीय कामात अडथळा करुन पोलीसांवर हमला करुन शासकीय वाहनाची तोडफोड करुन नुकसान केले. या प्रसंगी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील पोलीस मित्र नामे -१) गौरव प्रेमचंद पनवेलकर, वय २२ वर्ष, २) आशिष नामदेव भड, वय ३२ वर्ष, ३) अजय विजय कठाने, वय २४ वर्ष, ४) शोएब रशिद शेख, वय २१ वर्ष, ५) सलीम अल्लाउद्दीन बाघाडे, वय ४० वर्ष, ६) चेतन शंकरराव देशमुख, वय २६ वर्ष, ७) राहुल रामचंद्र नाखले, वय २८ वर्ष, ८) प्रणय रमेश घोडमारे, वय १९ वर्ष यांनी घटनास्थळी येवून पारशिवनी पोलीसांना घटनास्थळावून प्रेत हलविण्यास मदत केली व शांतता प्रस्थापीत करण्यास पुरेपुर मदत केलीवरील सर्व पोलीस मित्रांचा नागपूर (ग्रामीण), पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांच्या शुभहस्ते पोलीस मुख्यालय टेकानाका येथे दिनांक ३०/०४/२०१६ रोजी आयोजित एका सत्कार समारंभ कार्यक्रमामध्ये पुष्पगुच्छासह प्रमाणपत्र व रोख रक्कम देवून त्यांच्या गौरवांकीत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने, पोलीस उपअधीक्षक (गृह) श्रीरतनसिंग यादव, पो.नि.चंद्रशेखर बहादुरे, संजय पुरंदरे, सतीश गोवेकर, बाळु गायगोले, राखीव पोलीस निरीक्षक सतिश रिंगणे, सपोनि. वर्षा वंजारी, अरविंद सराफ, दिनेश लबडे व कर्मचारीवृंद मोठया संख्येत उपस्थित होते.

# ऑपरेशन मुस्कान मोहीमे मध्ये एकुण २६ मुलांचा शोध

पोलीस महासंचालक, म. रा. मुबंई यांचे निर्देशानुसार दिनांक ०१ एप्रिल ते ३० एप्रिल २०१६ या दरम्यान पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण), श्री. अनंत रोकडे यांचे मार्गदर्शनाखाली प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत ''ऑपरेशन मुस्कान'' हि मोहीम राबविण्यात आलेली आहे. या मोहीमेच्या प्रमुख सपोनि. अनामिका मिर्झापुरे या आहेत.

यामध्ये पोलीस स्टेशन कळमेश्वर, बोरी, कोंढाळी, नरखेड, कन्हान, मौदा, उमरेड,हिंगणा, जलालखेडा, खापरखेडा, कुही पोलीस स्टेशनच्या स्टाफच्या अथक प्रयत्नाने आतापर्यंत ''ऑपरेशन मुस्कान'' या मोहीमे अंतर्गत मुलांचा शोध लागलेला आहे. त्यामध्ये पोलीस स्टेशन कळमेश्वर मधुन-३, बोरी-४, कोंढाळी-२, नरखेड-२, कन्हान-४, उमरेड-१,मौदा-३, हिंगणा-१, जलालखेडा- २, खापरखेडा-१, कुही -२, जुनी कामठी - १ असे एकूण २६ मुलांचा शोध घेण्यात आलेला आहे. ऑपरेशन मुस्कान या शोध मोहीमेमध्ये हरविलेल्या मुलांचा शोध घेणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा आज दिनांक ३०/०४/२०१६ रोजी नागपूर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक श्री. अंनत रोकडे यांच्या शुभहस्ते पोलीस मुख्यालय, टेकानाका येथे आयोजित एका सत्कार समारंभ कार्यक्रमामध्ये प्रशस्तीपत्र देवून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा गौरवांकीत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने, पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. रतनसिंग यादव, पो.नि. चंद्रशेखर बहादुरे, संजय पुरंदरे, सतीश गोवेकर, बाळु गायगोले, राखीव पोलीस निरीक्षक सतिश रिंगणे, सपोनि. वर्षा वंजारी, अरविंद सराफ, दिनेश लबडे व कर्मचारीवृंद मोठया संख्येत उपस्थित होते.

# पालकमंत्री यांच्या शुभहस्ते नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील अधिकारी यांना मोबाईल फोन व टॅबचे वितरण

दिनांक २९/०४/२०१६ रोजी नागपूर (ग्रामीण) पोलीस मुख्यालय, टेकानाका येथे पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्मार्ट मोबाईल फोन व टॅब यांच्या वाटपाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रम हा जिल्हाधिकारी, नागपुर यांच्या नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत मिळालेल्या निधीतुन नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशनचे ठाणेदार तसेच शाखा प्रमुख यांना नागपुर जिल्हयाचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे (मंत्री, उर्जा व नविनीकरण उर्जा महाराष्ट्र शासन तथा पालकमंत्री) यांच्या शुभहस्ते देण्यात आले. नागपूर (ग्रामीण) जिल्हयामध्ये आधुनिकीकरणाचा वार करण्याच्या उद्देशान टॅब आणि फोन प्रत्येक पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले यामुळे पोलीसांना एकमेकांशी व्हॉटस्ॲप, इ-मे ल यासारख्या सुविधांचा वापर करुन दळणवळणाचा या एका सोप्या मार्गाचा अवलंब करण्यात आला. पोलीस महासंचालक यांच्या निर्देशनुसार सध्या ''प्रतिसाद ॲप'' हे संपूर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये सुरु करण्यात आले आहे. आणि या ॲपकरीता स्मार्ट फोन आणि टॅबच्या नक्कीच फायदा होईल. तसेच पोलीस अधिकारी यांना आपआपसामध्ये आपल्या कामकाजाबाबत या फोन व टॅबमुळे संवाद साधणे सोपे जाईल. तसेच गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी, तपासादरम्यान तंत्रज्ञान पुरावा गोळा करणेकामी याचा उपयोग करण्यात येईल. तसेच पेपरलेस वर्क कमी करण्याचाही एक प्रयत्न या फोनद्वारे करण्यात येईल. याकार्यक्रमा दरम्यान पोलीस अधीक्षक यांनी सांगीतले की, नागपूर ग्रामीण जिल्हयातील बिट अंमलदार यांनाही भविष्यामध्ये लवकरच स्मार्ट फोन देण्याचा मानस असून यामुळे ठाणेदार आणि बिट अंमलदार यांना कामकाजामध्ये येणाऱ्या अडी-अडचणी कमी होतील. जिल्हयातील पोलीस स्टेशन हिंगणा, जुनी कामठी आणि कामठी यांचे काही दिवसातच नागपूर शहर, पोलीस आयुक्तालय मध्ये हस्तांतरण करण्यात येणार आहे. आणि पोलीस स्टेशन खापरखेडा, देवलापार, कन्हान या पो.स्टे. ची नविन इमारतही लवकरच बांधण्यात येईल.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने, उपअधीक्षक (गृह) श्रीरतनसिंग यादव, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. दिपक सांळुके, रामटेक विभाग, श्री. मंगेश शिंदे, कामठी विभाग, श्री. अक्षय शिंदे, काटोल पोलीस स्टेशनचे ठाणेदार, श्री. ईश्वर कातकडे काटोल विभाग, श्री. सुरेश भोयर सावनेर विभाग तसेच ठाणेदार व शाखा प्रमुख आणि पोलीस कर्मचारी मोठया संख्येत उपस्थित होते.

# पोकलॅंड मशीनद्वारे रेतीचे उत्खनन

दिनांक २८/०४/२०१६ रोजी मिळालेल्या गुप्त माहिती वरुन तालुका पारशिवनी येथील पालोरा रेती घाट येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने रेड केली असता शासनाकडुन कोणत्याही प्रकारे परवानगी नसतांना लिलाव झालेल्या रेती घाटामध्ये पोकलॅड मशीनद्वारे रेतीचे उत्खनन होत असल्याचे दिसुन आले यावरुन घटनास्थळी मिळुन आलेल्या ऍस्कॉर्ट कंपनीची पोकलॅड मशीन किंमती अंदाजे ३५,००,०००/- रु. ची पोलीसांनी जप्त करुन पुढील कार्यवाही करीता तहसिलदार श्री. टेळे. ता. पारशिवनी यांचेकडे पत्र सादर केले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे, अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे. पो.नि. सतीश गोवेकर, पोहवा. लक्ष्मीप्रसाद दुबे, सुरज परमार, सुनिल मिश्रा, राजेश सनोडीया, शैलेश यादव, चालक ज्ञानेश्वर पाटील यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक २८/०४/२०१६ रोजी रात्री दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक नागपूर उपविभागातील बोरी व बेला परिसरात विभागीय गस्त करीत असतांना यादरम्यान २ इसम चंद्रपूरकडे आपले मोटार सायकलने देशी विदेशी दारुची विनापरवाना व अवैधरीत्या वाहतुक करणार असल्याबाबत गोपनीय माहिती सदर पथकाला मिळाली. या खात्रीशिर माहीतीची पथकाने तात्काळ दखल घेवून. महामार्ग क्र. ७ वर नाकाबंदी करुन सापळा रचण्यात आला व चंद्रपूरचे दिशेने येणाऱ्या वाहनांची कसोशीने पाहणी करीत असतांना वाहन क्र. एमएच - ३२/ए. सी. - ३३८२ चा चालक आरोपी क्र. १) प्रविण संजय छापेकर, वय २१ वर्ष, व त्याचा सहकारी आरोपी क्र. २) सुरज बलवंत डहाके, वय २० वर्ष, दोन्ही रा. समुद्रपूर हे आपले वाहनावर चुमडीमध्ये काहीतरी भरुन नेत असल्याचे पथकाचे लक्षात आले. नमुद दोन्ही इसमांना कुशलतेने सुरक्षीतरीत्या थांबवून त्यांची तपासणी केली असता देशी - विदेशी दारु असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्या ताब्यातुन देशी-विदेशी दारुच्या ५ पेटया व वाहन असा एकूण किंमती अंदाजे ७६,६००/- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता पोलीस स्टेशन बेला यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे, अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे. पो.नि. सतीश गोवेकर, सपोनि. उल्हास भुसारी, कर्मचारी दिलीप लांजेवार, सुरेश गाते, मनोज केदार, रमेश मालापुरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.